# आकाशवाणी पुणे
# प्रादेशिक वृत्त विभाग
# प्रादेशिक बातमीपत्र
# सकाळी 07 वाजून 10 मि

**दिनांकः25.01.2026** **वारःरविवार**

---

•अनेक देशांसोबतच्या करारांद्वारे भारतीय कामगारांना अमर्याद संधी असल्याचं पंतप्रधानांचा प्रतिपादन

•अठराव्या रोजगार मेळाव्यात ६१ हजार नियुक्तीपत्रांचं वाटप

•राष्ट्रीय शालेय वाद्यवृंद स्पर्धेत राज्यातील दोन शाळांना अग्रक्रमांक आणि

•ज्येष्ठ लेखिका शुभदा गोगटे यांचं वृद्धापकाळानं पुण्यात निधन

आता सविस्तर बातम्या

**रोजगार**

भारत अनेक देशांसोबत करार करत असल्यामुळे देशातील कुशल तरुणांसाठी संधी उपलब्ध होत असल्याचं पंतप्रधान मोदी यांनी काल अठराव्या राष्ट्रीय रोजगार मेळ्याला संबोधित करताना सांगितलं.

विविध राज्यांमधील 61 हजार युवकांना या मेळ्यात रोजगार नियुक्तिपत्रं प्रदान करण्यात आली. ही नियुक्तीपत्रं राष्ट्रनिर्माणासाठी एक आमंत्रण आहे. विकसित भारताच्या दिशेनं तरुणांना मार्गदर्शन करण्यासाठी एक संकल्पपत्र आहे असं मोदी म्हणाले.

**रोजगार**

पुण्यात केंद्रीय सहकार आणि विमान वाहतूक राज्यमंत्री मुरलीधर मोहोळ यांच्या उपस्थितीत केंद्रीय राखीव पोलिस दलाच्या ग्रुप सेंटरवर 25 युवकांना प्रातिनिधीक स्वरुपात नियुक्तीपत्रं देण्यात आली. सी आर पी एफ पुणेचे उपमहानिरीक्षक वैभव निंबाळकर यावेळी उपस्थित होते. सीआरपीएफ, बीएसएफ, आयटीबीपी, एसएसबी, आसाम

रायफल्स, बँक ऑफ बडोदा, युनियन बँक ऑफ इंडिया, ईपीएफओ, आयआयजीएम या विभागांमध्ये युवकांची नियुक्ती करण्यात आली आहे.  यावेळी बोलताना मोहोळ म्हणाले..

यावेळी मेळाव्यातील एक लाभार्थी प्रतीक म्हाळुंगेकर आकाशवाणीशी बोलताना म्हणाले....

**मन-की-बात**

पंतप्रधान नरेंद्र मोदी आज सकाळी ११ वाजता आकाशवाणीवरील मन की बात कार्यक्रमात देश आणि परदेशातील लोकांशी संवाद साधतील.  या कार्यक्रमाचा हा १३० वा भाग असेल. हा कार्यक्रम आकाशवाणी आणि दूरदर्शन नेटवर्क, आकाशवाणी न्यूज वेबसाइट आणि न्यूजऑन एआयआर मोबाईल ॲपवर प्रसारित केला जाईल. आकाशवाणी, दूरदर्शन ,पंतप्रधान कार्यालय आणि माहिती आणि प्रसारण मंत्रालयाच्या यूट्यूब चॅनेलवर देखील याचं थेट प्रसारण केले जाईल. हिंदी प्रसारणानंतर, आकाशवाणी हा कार्यक्रम प्रादेशिक भाषांमध्ये प्रसारित करेल.

**राष्ट्रपती**

प्रजासत्ताक दिनाच्या पूर्वसंध्येला राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू आज संध्याकाळी सात वाजता देशवासियांना संबोधित करणार आहेत.

**AKASHVANI-MEDIAAWARD**

आकाशवाणीच्या वृत्त सेवा विभागाला २०२५ वर्षासाठी 'मतदार शिक्षण जागृतीवरील सर्वोत्तम मोहीम' या श्रेणीमध्ये इलेक्ट्रॉनिक विभागातला माध्यम पुरस्कार जाहीर झाला आहे. हा पुरस्कार आज नवी दिल्लीत  राष्ट्रीय मतदार दिनाच्या सोहळ्यात राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांच्या हस्ते प्रदान केला जाणार आहे. निवडणूक प्रक्रियेतील सहभाग वाढवण्यासाठी आणि निवडणुकांबाबत जागरूकता निर्माण करण्याकरिता आकाशवाणीनं दिलेल्या योगदानासाठी हा पुरस्कार देण्यात येत आहे.

**सर्वोत्कृष्ट-कार्यालयं**

प्रजासत्ताक दिनाच्या पार्श्वभूमीवर उद्या राज्यातल्या  सर्वोत्कृष्ट कार्यालयांची नावं जाहीर करण्यात येणार असल्याची माहिती मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी दिली आहे. राज्य सरकारच्या महत्वाकांक्षी १५०  दिवसांच्या ई-गव्हर्नन्स सुधारणा कार्यक्रमांतर्गत विविध कार्यालयाची संकेतस्थळ ,आपले सरकार प्रणाली, यांच्यासह ७ मुद्यांवर उत्कृष्ट कार्य

करणाऱ्या कार्यालयांचं दुसऱ्या टप्प्यातलं मूल्यमापन, भारतीय गुणवत्ता परिषदेच्या वतीनं करण्यात येत असल्याचं मुख्यमंत्र्यांनी सांगितलं.

**<u>इंट्रो-मनोज</u>**

राष्ट्रपति द्रौपदी मुर्मू यांनी विविध क्षेत्रातल्या मान्यवर व्यक्तींना प्रजासत्ताक दिनाच्या सोहळ्याला निमंत्रित केलं आहे. जैवतंत्रज्ञानात लागणारे घटक आयात न करता देशातच निर्माण करुन आत्मनिर्भर भारत संकल्पामध्ये योगदान देणाऱ्या पुण्यातल्या हायटेक बायो सायन्सेस इंडिया प्रायवेट लिमिटेड या कंपनीच्या राघवेंद्र गायकैवारी यांचा निमंत्रितांमध्ये समावेश आहे. या निमंत्रणाबद्दल आपल्या भावना आकाशवाणीसोबत व्यक्त करताना राघवेंद्र गायकैवारी म्हणाले..

**<u>वॉका-जनगणना</u>**

**<u>इंट्रो-</u>**

१ एप्रिलपासून सुरू होणाऱ्या जनगणनेच्या पहिल्या टप्प्यात नागरिकांना विचारले जाणारे ३३ प्रश्न सरकारनं अधिसूचित केले आहेत. जनगणना २०२७ च्या पहिल्या टप्प्यात, १ एप्रिल ते ३० सप्टेंबर दरम्यान घरगणना प्रक्रिया - प्रत्येक राज्य आणि केंद्रशासित प्रदेशानं निश्चित केलेल्या ३० दिवसांच्या कालावधीत पार पडेल. यासंबंधी एक वृत्तांत माझे सहकारी मनोज क्षीरसागर यांच्याकडून...

**<u>स्क्रिप्ट-</u>**

जनगणना करणारे कर्मचारी सर्वेक्षणादरम्यान घराच्या मालकीची स्थिती, त्याचा वापर, फरशी आणि छतासाठी वापरलेल्या साहित्याचा प्रकार, खोल्यांची संख्या आणि कुटुंबप्रमुखाचे लिंग याबद्दल विचारणा करतील. त्यानंतर घराचा वापर, त्याची स्थिती आणि कुटुंबात सामान्यतः राहणाऱ्या व्यक्तींची संख्या याबद्दल विचारतील. कुटुंबप्रमुख अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती किंवा इतर समुदायाचा आहे की नाही आणि मालकीची स्थिती याबद्दलची माहिती देखील ते गोळा करतील.

नागरिकांना त्यांच्या घरातील मूलभूत सुविधांबद्दलही विचारले जाईल, म्हणजे पिण्याच्या पाण्याचा मुख्य स्रोत, प्रकाशाचा मुख्य स्रोत, शौचालयाची उपलब्धता आणि प्रकार, सांडपाण्याचा निचरा, आंघोळीच्या सुविधेची उपलब्धता, स्वयंपाकघराची उपलब्धता आणि एलपीजी आणि पीएनजी कनेक्शन आणि स्वयंपाकासाठी वापरले जाणारे मुख्य इंधन. रेडिओ आणि ट्रान्झिस्टर, दूरदर्शन, इंटरनेटची उपलब्धता, लॅपटॉप, संगणक, टेलिफोन, मोबाईल फोन, स्मार्टफोन

यांसारखी उपकरणं, वाहनाचा प्रकार, कुटुंबात भोजनासाठी वापरलं जाणारं मुख्य धान्य आणि जनगणनेशी संबंधित संवादासाठी मोबाईल क्रमांक याबद्दलची माहिती देखील गोळा करतील.३० दिवसांच्या घरगणना कार्यान्वित होण्याच्या अगदी आधीच्या १५ दिवसांच्या कालावधीत स्व-जनगणनेचा पर्याय देखील उपलब्ध असेल. जनगणना दोन टप्प्यांत घेतली जाईल - एप्रिल ते सप्टेंबर या कालावधीत घरगणना आणि गृहनिर्माण जनगणना; आणि फेब्रुवारी २०२७ मध्ये लोकसंख्या गणना.

**शहीदी-समागम**

श्री गुरु तेग बहादूर साहिबजी यांच्या ३५० व्या शहीदी समागम वर्षानिमित्त “हिंद-दी-चादर” अंतर्गत नांदेड इथं आयोजित भव्य कार्यक्रमात काल राज्याचे जलसंपदा मंत्री गिरीश महाजन, माजी मुख्यमंत्री तसंच खासदार अशोक चव्हाण आणि इतर मान्यवरांसह हजारो भाविकांनी श्री गुरु ग्रंथसाहिबजी यांचं पवित्र दर्शन घेतलं. श्री गुरु तेग बहादूर साहिबजी यांच्या त्याग, धर्मनिष्ठा आणि मानवतेच्या संदेशाचं स्मरण या शहीदी समागमाच्या माध्यमातून करण्यात येत असून या कार्यक्रमातून समाजात बंधुता आणि एकतेचा संदेश पोहोचत आहे.

**सांगली-संत-समागम**

कालपासून सांगली इथं सुरु झालेल्या ५९ व्या निरंकारी संत समागमाचा शुभारंभ, आकर्षक शोभायात्रेनं करण्यात आला. या शोभायात्रेत महाराष्ट्रासह देशाच्या विविध भागातून आलेले कलाकार भक्त सहभागी झाले होते.

**NSBC-Maha-Info-Centre**

प्रजासत्ताक दिन सोहळ्यानिमित्त आयोजित करण्यात आलेल्या सातव्या 'नॅशनल स्कूल बँड कॉम्पिटिशन' अर्थात NSBC मध्ये महाराष्ट्रातल्या विद्यार्थ्यांनी शिस्तबद्ध संचलन आणि सुरावटींच्या जोरावर बाजी मारली. नवी दिल्लीतल्या राष्ट्रीय बाल भवन इथं झालेल्या महाअंतिम फेरीत मुलांच्या ब्रास बँड गटात अहिल्यानगर जिल्ह्यातील कोपरगाव इथल्या संजीवनी सैनिकी शाळेनं देशात प्रथम क्रमांक पटकावून सुवर्णपदकावर नाव कोरलं,

**गोगटे-निधन**

ज्येष्ठ मराठी लेखिका शुभदा गोगटे यांचं काल वृद्धापकाळानं पुण्यात निधन झालं. त्या ८२ वर्षांच्या होत्या. त्यांनी देहदान केलं होतं.

शुभदा गोगटे यांच्या यंत्रायणी या पहिल्याच वैज्ञानिक कादंबरीला १९८३मध्ये महाराष्ट्र सरकारचा साहित्य पुरस्कार मिळाला. साहित्य अकादमी आणि राष्ट्रीय पुस्तक न्यास यांनी प्रकाशित केलेल्या भारतीय वैज्ञानिक कथांच्या प्रातिनिधिक संग्रहांत त्यांच्या विज्ञान कथांचा समावेश आहे. भारतातील रेल्वे इतिहासाच्या पार्श्वभूमीवर आधारित ‘खंडाळ्याच्या घाटासाठी’ आणि ‘सांधा बदलताना’ या त्यांच्या दोन कादंबऱ्या बऱ्याच गाजल्या.

**<u>हवामान</u>**

राज्यात आज सर्वत्र कोरडं हवामान राहण्याचा अंदाज हवामान विभागानं वर्तवला आहे.

**आकाशवाणी पुणे केंद्रावरचं प्रादेशिक बातमीपत्र संपलं, नमस्कार.**